Vol - V Issue-IX SEPTEMBER 2018 ISSN 2349-638x Impact Factor 4.574

# पंचायतराज व्यवस्था व महिलाचा राजकीय सहभाग

**डॉ. डी. एस. पटवारी**
(राज्यशास्त्र विभागप्रमुख)
श्री कुमारस्वामी महाविद्यालय,औसा जि. लातूर ४१३५२०

भारत जगातील एक सर्वात मोठी लोकशाही असणारे राष्ट्र आहे. भारतीय संविधानाने प्रौढ मताधिकाराद्वारे लोकशाही गणराज्याची स्थापना केलेली आहे. स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंनी स्पष्ट केले होते की, ''हम लोकतंत्र चाहते हैं, लोकतंत्र की स्थापना हमारा लक्ष्य है और उससे कम हम कुछ नहीं चाहते।'' शासनाच्या अनेक प्रकारातील लोकशाही असा एक शासन प्रकार आहे.ज्यामध्ये जनता शासनाच्या अधिकाराचा वापर स्वत: किंवा त्यांनीच निवडलेल्या जनप्रतिनिधींमार्फत अप्रत्यक्ष करू शकते. प्रतिनिधीक लोकशाही अधिक व्यावहारिक असल्यामुळे आधुनिक जगातील बहुतांशी देशांमध्ये लोकशाहीचे हेच स्वरूप लोकप्रिय ठरलेले आहे.

पंचायत म्हणजे 'पंच-आयत'शाब्दीक दृष्टीने गावातील लोकांद्वारे निवडलेल्या पाच व्यक्तींचा समूह होय. वास्तविकपणे विचार केल्यास असे लक्षात येते की, पंचायतीद्वारे भारतातील असंख्य ग्रामीण जनतेवर शासन केले जाते. तसेच या ग्रामीण जनतेमध्ये स्वशासनाची भावना जागृत केली जाते. प्राचीन भारताच्या अनेक ग्रंथातून 'पंचायत' शब्दाची ''व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे असे दिसते. संस्कृत भाषेच्या ग्रंथानुसार ''किसी आध्यात्मिक पुरुष सहित पाँच पुरुषों के समूह अथवा वर्ग को पंचायत के नाम से सम्बोधित किया जाता था''।

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. त्यामुळे महात्मा गांधीजींनी खेड्यांचे महत्त्व ओळखून खरा भारत खेड्यांमध्ये आहे, हे ओळखून त्यांनी 'खेड्यांकडे परत चला' असा नारा दिला होता. तसेच 'रामराज्याची'कल्पना मांडून ग्रामस्वराज्याचे स्वप्न पाहिले होते.भारतातील प्रत्येक ग्राम स्वावलंबी झाले पाहिजे, प्रत्येक गावातील लोकांच्या गरजा गावातच पूर्ण झाल्या पाहिजेत, असा विचार त्यांनी मांडला. तसेच ते म्हणतात की, 'अगर हिन्दुस्थान के हर एक गाँव में कभी पंचायत राज कायम हुआ तो मैं अपनी इस तस्वीर की सच्चाई को साबित कर सकूँगा, जिसमें सबसे पहला और सबसे आखिरी दोनों बराबर होंगे यों कहिए कि न कबराबर होंगे यों कहिए कि न कोई पहला होगा, न आखिरी।'

पंडित नेहरुंनी असे म्हटले होते की, 'लोकतंत्र का अर्थ केवल राजनीतिक एवं आर्थिक ही नहीं है अपितु कुछ-कुछ मानसिकता से भी है अर्थात लोकतंत्र में प्रत्येक व्यक्ति को आर्थिक एवं राजनीतिक क्षेत्र में समानता के अवसर मिलने चाहिए।' तसेच अन्य एके ठिकाणी म्हणाले होते की, 'गाँव के लोगों को अधिकार सौंपने चाहिए। उन्हें काम करने दो, चाहे वे हजार गलतियाँ करें, इससे घबराने की जरुरत नहीं। पंचायतों को अधिकार दिये जाने चाहिये।'तसेच रॉब्सनने यासंदर्भात असे म्हटले आहे की, 'राष्ट्रीय स्तर पर लोकतंत्र स्वस्थ एवं सुदृढ रुप में तभी सफल हो सकता है यदि स्थानीय स्तर पर लोकतांत्रिक संस्थाओं को भी पूर्ण प्रोत्साहन व पूर्ण सहयोग दिया जाये।'

या व अशा महान व्यक्तींच्या व विचारवंतांच्या विचारांतून भारतीय संविधानाच्या निर्माणकर्त्यांनी १९ नोव्हेंबर १९४८ ला मार्गदर्शक तत्त्वांवर चर्चा करतेवेळी भारतीय संविधानात ग्रामपंचायतीला स्थान देण्याचे ठरवले. आज २१ व्या शतकात जगातील प्रत्येक देशाच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. अशा शासनाचा कारभार फक्त केंद्रात बसून काही मंडळींमार्फत योग्य व परिणामकारक होणार नाही. म्हणून सत्तेच्या विकेंद्रीकरणाची गरज वेळोवेळी अनेक व्यक्तींनी सांगितलेली आहे.

भारतीय स्वातंत्र्यानंतर सत्ता विकेंद्रीकरणाच्या दृष्टिकोनातून पंचायतराज व्यवस्था बळकट करण्याचे प्रयत्न करण्यात आले. स्वर्गीय राजीव गांधी यांनी पंचायतराज व्यवस्था प्रभावी बनविण्यासाठी इ.स.१९८९ मध्ये ६४ वे घटनादुरुस्ती विधेयक मांडले

होते. पुढे त्याचेच रुपांतर ७३ व्या घटनादुरुस्तीत झाले. “या घटनादुरुस्तीस २२ डिसेंबर १९९२ ला लोकसभा व २३ डिसेंबर १९९२ ला राज्यसभेची मंजूरी प्राप्त झाली. भारतातील १७ घटक राज्यांच्या मान्यतेनंतर २० एप्रिल १९९३ ला राष्ट्रपतींनी त्यावर सही केली. २४ एप्रिल १९९३ पासून अंमलबजावणी व २४ एप्रिल १९९४ पर्यंत राज्यांना आपापल्या पंचायतराज अधिनियमात दुरुस्ती करून घेण्याची सूचना करण्यात आली .”

७३ व्या घटना दुरुस्तीमुळे पंचायतराज संस्थांना जीवनदानच मिळाले. याच घटनादुरुस्तीमुळे ग्रामीण भागाच्या शेवटच्या स्तरापर्यंत राजकीय सत्ता जाण्यास मदत झाली. या घटनादुरुस्तीचे आणखीन एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे या दुरुस्तीमुळेच अनुसूचित जाती- जमाती व महिलांना सत्तेत वाटा मिळावा म्हणून ‘आरक्षण’ देण्यात आले. त्यामुळे ग्रामीण भागातील तळागाळातील जनतेला सत्तेत वाटा मिळाला. पंचायतराज संस्था लोकशाहीची आधारशीलाच आहे. भावी राजकीय नेत्यांना राजकीय प्रशिक्षण देणारी ती जणू एक शाळाच आहे.

जगातील इतर राष्ट्रांबरोबरच भारतातसुद्धा स्त्रियांना नेहमीच दुय्यमत्व दिले गेलेले आहे. वेळोवेळी महान व्यक्तींनी व विचारवंतांनी स्त्री-पुरुष समानतेसाठी आग्रह धरलेला दिसून येतो. स्त्रियांच्या समान अधिकारांचा उल्लेख सर्वप्रथम “सन १७९२ में मेरी वौलस्टोन क्राफ्ट की पुस्तक विंडिकेशन ऑफ दि राइट्स ऑफ वीमेन (Mary Wollstone Crafts,Vindication of the Rights of Women) में मिलता है।” शिक्षणाच्या माध्यमातून मेरी स्त्रियांचा नैतिक आणि बौद्धिक विकास करू इच्छित होती. त्यांच्या मते, स्त्रिया उच्च शिक्षण घेवून डॉक्टर आणि व्यापारी बनण्यासोबत राजकारणात प्रवेश करू शकतात.

पाश्चात्य राष्ट्रातील मेरी नंतर हैरियट टेलर आणि जॉन स्टुअर्ट मिल यांनी महिलांच्या परिस्थितीत बदल करण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. इ.स.१८६९ मध्ये जे.एस. मीलने ‘The Subjection of Women’या ग्रंथामध्ये स्त्रियांच्या ऐतिहासिक दमनामध्ये कायद्याची व्यवस्था जबाबदार असल्याचे म्हटले आहे. जॉन स्टुअर्ट मीलच्या मते, ‘पुरुष प्रधान कानूनी व्यवस्था की वजह से एक लिंग का दूसरे पर वर्चस्व होता रहा है।’ परंतु आधुनिक काळात स्त्री-पुरुषांना समान कायदा व कायद्याने समान संरक्षण आहे.

मतदानाच्या अधिकारासाठी भारतीय महिलांच्या संघर्षाची सुरुवात स्वतंत्रता आंदोलनाच्या दरम्यानच झाली होती. भारतीय महिलांकडून त्यांच्या राजकीय हक्कांची सर्वप्रथम मागणी १९१७ मध्ये पुढे आली की, महिलांनासुद्धा नागरिकांचा दर्जा दिला जावा. इ.स.१९१९ मध्ये मतदानाच्या अधिकाराच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी ‘साऊथ ब्युरो कमिशन’भारतात आले. तेव्हा श्रीमती ॲनी बेझंट यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधी मंडळाने भारतीय महिलांच्या मताधिकाराच्या बाजूने दबाव टाकला होता. मद्रास विधान परिषदेने महिलांना १९२० मध्ये मतदानाचा अधिकार दिला, तर मुंबई विधान परिषदेने १९२१ मध्ये महिलांना मतदानाचा अधिकार दिला. इ.स १९२९ पर्यंत सर्वच प्रांतीय विधान परिषदांमध्ये महिलांना मताधिकार दिले.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. भारताने सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्याचा स्वीकार केला आणि भारतातील सर्व नागरिकांस कोणत्याही प्रकारच्या भेदभावाशिवाय प्रौढ मताधिकार बहाल केला. अशा पद्धतीने भारतीय संविधानाने महिलांच्या स्वतंत्र, सक्रिय आणि समान राजकीय भूमिकेचा स्वीकार केला. इ.स.१९९३ साली ७३ वी घटनादुरुस्ती करून पंचायतराज व्यवस्थेला घटनात्मक दर्जा देण्यात आला आणि भारतातील तळागाळापर्यंत सत्तेचे खरे विकेंद्रीकरण होण्यास प्रारंभ झ ाला. याचबरोबर समाजातील मागासलेल्या लोकांना व स्त्रियांना आरक्षण देण्यात आले आणि हा विषय राज्याच्या अधिकारात ठेवण्यात आला. भारतातील काही पुरोगामी घटकराज्यांनी महिलांच्या ३३ टक्के आरक्षणात वाढ करून त्यांच्या आरक्षणाचे प्रमाण १/२ म्हणजे ५० टक्के केले आहे. त्यात महाराष्ट्र हे सुद्धा घटकराज्य आहे. २०११ पासून महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्थेमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाची अंमलबजावणी सुरू करण्यात आलेली आहे.

**पंचायतराजची पाच तत्त्वे:-**

पंचायतराजच्या काही अनिवार्य अटी आहेत. त्या अटींमध्ये खालील पाच तत्त्वांचा समावेश होतो.

**१) सहभाग:-**

पंचायतराजची मुख्य संचालन शक्ती म्हणजे ‘सहभाग’होय. पंचायत ही कोण्या एका वर्गाची, पंथाची, धर्माची, जातीची, व्यक्ती अथवा व्यक्तिसमूहाची नसून गावातील सर्व नागरिकांची संस्था आहे. भारतीय संविधानाने ग्रामसभेला गावाचे संपूर्ण अधिकार दिलेले आहेत. या ग्रामसभेत गावातील सर्वच मतदार नागरिकांचा समावेश होतो. तसेच ग्रामपंचायतीतील सदस्यांचे किंवा ग्रामपंचायतीचे

विघटन होऊ शकते. परंतु ग्रामसभा स्थायी आहे. यामध्ये गावातील सर्व नागरिकांनी एकमेकांच्या सहकार्याने गावाचा विकास करणे अपेक्षित आहे.

**२) सामाजिक समता:-**

सहभाग आणि सामाजिक समता परस्परपूरक आहेत. सहभागाला मूर्त रूप देण्यासाठी सामाजिक समता येणे गरजेचे आहे. गावाचा विकास करायचा असेल, गावातील प्रश्न मार्गी लावायचे असतील, पंचायतीचे संचलन योग्य करायचे असेल तर गावामध्ये सामाजिक समता असणे गरजेचे आहे. सामाजिक समतेशिवाय वरील गोष्टी प्रत्यक्षात उतरू शकत नाहीत.

**३) आर्थिक विकास:-**

फार पूर्वीपासून असे म्हटले जाते की, 'सर्व सोंगं घेता येतात पण पैशाचे सोंग घेता येत नाही.'अगदी त्याचप्रमाणे गावाचा विकास करायचा असेल तर गावाचा आर्थिक विकास होणे गरजेचे आहे. गावातील, शिवारातील आर्थिक विकासाची कामे पूर्णत्वाकडे नेण्यासाठी पैसा गरजेचा आहे. त्याशिवाय गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, स्वच्छता, रस्ते, नाली, दिवाबत्ती, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, मजुरांचे प्रश्न सोडविता येणार नाहीत.

**४) पारदर्शकता:-**

पंचायतराजचा फायदा समाजाच्या मुळापर्यंत पोहचविण्यासाठी यामध्ये पादर्शकता असणे गरजेचे आहे. कारण पूर्वी सरपंच व काही मोजके सदस्य संगणमत करून गुपचूप निर्णय घेऊन गावकऱ्यांचा विश्वासघात करीत होते. परंतु सध्या ग्रामपंचायतीचे निर्णय ग्रामसभेत सर्वांच्या चर्चेसाठी ठेवावे लागत आहेत. मागील निधीचा व्यय सांगावा लागतो. तसेच शिल्लक निधी व त्याचे अपेक्षित विवरण सर्वांना सांगावे लागते. ग्रामसभेत यावर सखोल चर्चा होते. ही अशी विद्यमान पंचायतराजच्या कारभाराची पारदर्शकता आहे.

**५) प्रशिक्षण:-**

पंचायतराजच्या कारभारातील बारकावे समजून घेण्यासाठी त्यासाठी आवश्यक असलेले योग्य प्रशिक्षण ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी, कर्मचाऱ्यांसोबतच गावकऱ्यांनासुद्धा मिळणे अत्यावश्यक आहे. पंचायतराजच्या संदर्भात सर्वांनाच आपापल्या अधिकारांसोबतच कर्तव्याची सुद्धा जाण असणे महत्त्वाचे असते. त्यासाठी योग्य प्रशिक्षण, योग्य अशा व्यक्तीच्या मार्फत होणे गरजेचे असते. प्रशिक्षणाचा कालावधी, वेळ, साहित्य, गाणे, नाटक, फिल्म इत्यादींचा वापर करून प्रशिक्षण रोचक बनविले पाहिजे.

**७३ वी घटनादुरुस्ती:-**

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्याचबरोबर काँग्रेस पक्षाने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांचे पुनरुज्जीवन करण्याचे प्रयत्न सुरू केले. त्याचाच एक भाग म्हणून आरोग्यमंत्री अमृत कौर यांनी इ.स. १९४८ मध्ये देशातील सर्व राज्याची स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी एक बैठक बोलावली. या बैठकीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नावर चर्चा करून सोडविण्याच्या दृष्टीने घटकराज्यांना मागदर्शन करण्यात आले. या बैठकीमध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू म्हणाले की, 'स्थानिक स्वराज्यसंस्था या खऱ्या अर्थाने लोकशाहीचा आधार आहेत आणि त्या असायलाच पाहीजेत. '

भारतीय संविधानाच्या कलम ४० नुसार, 'राज्य हे ग्रामपंचायती संघटीत करण्यासाठी उपाययोजना करील व त्यांना स्वराज्याचे मूल घटक म्हणून कार्य करण्यास समर्थ करण्यासाठी आवश्यक असतील असे अधिकार व प्राधिकार बहाल करील.' या राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक गावासाठी ग्रामपंचायती स्थापन झाल्या. इ.स. १९५७ मध्ये स्थापन झालेल्या श्री.बलवंतराय मेहता समितीने आपला अहवाल केंद्राकडे २४ नोंव्हेबर १९५७ ला सादर केला. या समितीच्या शिफारशी १ एप्रिल १९५८ पासून लागू करण्यात आल्या. त्यानुसार लोकशाहीचे खरे- खुरे विकेंद्रीकरण करण्यासाठी पंचायतराज संस्थाची स्थापना करण्यात आली. पंचायतराज हा विषय राज्यसूचीत समाविष्ट असल्यामुळे प्रत्येक घटकराज्याने आपापल्या सोयीनुसार पंचायतराज व्यवस्था निर्माण केली. पं.जवाहरलाल नेहरु यांनी राजस्थानची राजधानी जयपूरपासून २६० कि.मी. दूर नागौर येथे २ ऑक्टो. १९५९ रोजी स्वतंत्र भारताच्या पहिल्या पंचायतराजचे उद्घाटन केले. या उद्घाटनपर भाषणात त्यांनी

'भारतातील सर्वात महत्वपूर्ण व ऐतिहासिक पाऊल.' या शब्दात वर्णन केले. आंध्र प्रदेशामध्ये १ नोव्हेंबर १९५९ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांची सुरुवात झाली. भारतातील सर्व घटकराज्यातील पंचायतराज व्यवस्थेत एकसूत्रता निर्माण करून पंचायत राजसंस्थाचे पुनरुज्जीवन करण्याच्या उद्देश्याने केंद्र सरकारने १९५६ मध्ये डॉ.एल.एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन केले. या समितीने पंचायतराज संस्थांना पुरेसे अधिकार देऊन त्यांना घटनात्मक संरक्षण देण्याची शिफारस केली. केंद्र सरकारने

सिंघवी समितीच्या शिफारशीवरून ६४ वे घटनादुरूस्ती विधेयक १५ मे १९८९ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्री.राजीव गांधी यांनी लोकसभेत मांडले होते. त्यातील प्रमुख विषय पुढीलप्रमाणे होते.

१) तीन स्तरावर पंचायतराज व्यवस्थेचे नियोजन
२) महिलांकरिता ३० टक्के आरक्षण
३) वित्त आयोगाची स्थापना
४) निवडणूक आयोगाच्या माध्यमातून पंचायतराज संस्थांच्या निवडणूका घेणे.
५) नियंत्रक व महालेखा परिक्षकाद्वारे पंचायत संस्थांची पडताळणी.

१० ऑगस्ट १९८९ रोजी लोकसभेने हे विधेयक मंजूर केले. परंतु राज्यसभेत ते फेटाळण्यात आले. इ.स. १९९१ मध्ये पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यानंतर झालेल्या सार्वत्रीक निवडणूकीमध्ये २१ जून १९९१ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान झाले. १६ सप्टेंबर १९९१ रोजी पंचायतराज संस्थाबाबतचे घटनादुरूस्ती विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. या विधेयकावर सर्वपक्षीय विचार व्हावा म्हणून ३० सभासद असलेल्या संयुक्त संसदीय समितीने सविस्तर अभ्यास करून आपला शिफारस अहवाल जूलै १९९२ मध्ये संसदेस सादर केला. लोकसभेने २२ डिसेंबर १९९२ रोजी, तर राज्यसभेने २३ डिसेंबर १९९२ रोजी या ७३ व्या घटनादुरूस्तीस मंजूरी दिली.

७३ व्या घटनादुरूस्तीचा विषय 'पंचायतराज'हा राज्यसुचीतील असल्यामुळे या विषयावर घटनादुरूस्ती करताना लोकसभा आणि राज्यसभेच्या संमतीबरोबरच देशातील निम्म्यापेक्षा अधिक घटकराज्यांच्या विधीमंडळाची संमती आवश्यक असते. त्यामुळेच संसदेने पारित केलेले हे विधेयक घटक राज्य विधीमंडळाच्या संमतीसाठी पाठविण्यात आले. एकूण १७ घटकराज्यांनी या विधेयकाला संमती दिली. त्यामुळे २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींनी या विधेयकावर स्वाक्षरी केली. २४ एप्रिल १९९३ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली. आणि २४ एप्रिल १९९४ पर्यंत राज्यांना अंमलबजावणीसाठी मुदत देण्यात आली.

**७३ व्या घटनादुरूस्तीचा उद्देशः-**

राष्ट्रीय स्तरावरून ग्रामस्तरापर्यंत लोकशाहीचे विकेंद्रीकरण करणे हाच पंचायतराजचा प्रमुख उद्देश होता. यामुळेच पंचायतराज संस्थामधील दोष दूर करून त्यांचा विकास करण्याच्या उद्देशाने केंद शासनाने वेळोवेळी अनेक समित्या स्थापन केल्या. त्यात प्रामुख्याने १६ जाने १९५७ ची श्री. बलवंतराय मेहता समिती, १२ डिसेंबर १९७७ ची श्री.अशोक मेहता समिती, २५ मार्च १९८५ ची श्री.जी.व्ही.के. राव समिती, १९८६ ची डॉ. एल.एम. सिंघवी समिती इत्यादींचा समावेश होतो. या समित्यांनी केलेल्या वेळोवेळीच्या शिफारशींच्या आधारेपंचायतराज संस्थांच्या विकासाचे प्रयत्न झाले. राजीव गांधीच्या लक्षात आले की, केंद्र म्हणजे राष्ट्रीय स्तरावर एक रूपया खर्च केला तर त्यातील २० पैसेच शेवटच्या ग्रामस्तरापर्यंत पोहचतात. ही परिस्थिती बदलून पंचायतराज अधिक बळकट करण्यासाठी राजीव गांधीनी सुरू केलेले प्रयत्न पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान असताना ७३ वी घटना दुरूस्ती करून पंचायतराजला घटनात्मक दर्जा देऊन थांबले. या घटनादुरुस्तीचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे.

१) पंचायतराज संस्थांना घटनात्मक वैधानिक आधार प्राप्त करून देणे.
२) अनुसूचित जाती - जमाती, महिला व इतर मागासवर्गीयांना पंचायत संस्थांमध्ये पुरेसे प्रतिनिधीत्व मिळवून देणे.
३) देशातील पंचायतराज संस्थामधील विविधता काही प्रमाणात कमी करून त्यांच्यात एकसुत्रता निर्माण करणे.
४) लोकशाही नियोजनाचा लाभ सर्वसामान्य ग्रामीण जनतेपर्यंत पोहचविणे.
५) विकास योजनांचा निधी मुख्य लाभार्थीपर्यंत पोहोचविणे.
६) पंचायतराज संस्थामध्ये अनियमित होणाऱ्या निवडणूका टाळणे.
७) अनुसूचित जाती-जमाती व महिलांना आरक्षण देऊन घटनात्मक संरक्षण देणे.
८) पंचायतराजच्या तिन्ही स्तरावर प्रत्यक्ष मतदान पद्धती लागू करणे.
९) घटकराज्यांकडून पंचायत संस्थांना पुरेशा अधिकाराबरोबरच पुरेसा निधी उपलब्ध करून त्यांचे आर्थिक परावलंबित्व दूर करणे.
१०) पंचायतराज संस्थांचे राजकीय प्रमुख, प्रशासकीय अधिकारी यांच्यात सामंजस्य व सहकार्याचा दृष्टीकोन निर्माण करणे.

**७३ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्येः-**

लोकशाहीचे खरे विकेंद्रीकरण आणि तळागळातील शेवटच्या लोकांपर्यंत स्थानिक स्वशासनाची सूत्रे पोहचविणाऱ्या या ७३ व्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**१) व्याख्याः-**

पंचायतराजच्या विविध घटकांबद्दल कसलीही संदिग्धता असू नये म्हणून भारतीय राज्यघटनेच्या २४३ व्या कलमांमध्ये पंचायतराजशी संबंधित 'जिल्हा', 'ग्रामसभा' मधली पातळी 'पंचायत', 'पंचायत क्षेत्र', 'लोकसंख्या', 'ग्राम'इत्यादी शब्दांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. उदा. मधली पातळी याचा अर्थ एखाद्या राज्याच्या राज्यपालाने या भागाच्या प्रयोजनांसाठी मध्यम पातळी म्हणून जाहीर अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट केली असेल अशी ग्राम व जिल्हा पातळी यांमधील पातळी असा आहे

**२) त्रिस्तरीय व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्तः-**

या घटनादुरुस्तीद्वारे पंचायतराज व्यवस्था त्रिस्तरीय ठरविण्यात आली. गाव पातळीवर 'ग्रामपंचायत'तालुका पातळीवर 'पंचायत समिती'आणि जिल्हा पातळीवर 'जिल्हा परिषद'या संस्था स्थापन केल्या जातील. परंतु ज्या घटकराज्यांची लोकसंख्या २० लाखापेक्षा कमी असेल त्या राज्यांनी त्रिस्तरीय व्यवस्थेतील मधला स्तर (पंचायत समिती) निर्माण न करण्याची सूट या घटनादुरुस्तीने दिलेली आहे. भारतीय राज्यघटनेत पहिल्यांदाच भाग ९ वा, कलम २४३ ते २४३ (ओ) अशी एकूण १६ कलमे आणि एक नवीन ११ वे परिशिष्ट जोडून ग्रामीण स्थानिक स्वशासनाला स्थान दिले.

**३) पंचायतराजची स्थापना करणे बंधनकारकः-**

या घटनादुरुस्तीनुसार पंचायतराजची स्थापना करण्याचे बंधन प्रत्येक राज्यावर घातलेले आहे. त्यामुळे पंचायतराजची स्थापना करणे ही घटकराज्याची 'घटनात्मक जबाबदारी' ठरली आहे.

**४) ग्रामसभेची तरतूदः-**

या घटनादुरुस्ती कायद्यामध्ये स्थानिक स्वशासनाचा घटक म्हणून ग्रामसभेला महत्त्व देण्यात आले. संपूर्ण गावासाठी ग्रामसभा असेल. गावातील सर्व प्रौढ स्त्री-पुरुषांचा त्यामध्ये समावेश असेल. ग्रामसभेच्या माध्यमातून कायदेमंडळात्मक स्वरुपाचे कार्य पार पाडले जाईल. ग्रामसभेचे अधिकार व कार्ये निश्चित करण्याचा अधिकार प्रत्येक राज्याच्या कायदेमंडळाला असेल.

**५) समान कार्यकालः-**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २४३ (ड) नुसार, प्रत्येक 'पंचायत, जिच्या पहिल्या बैठकीकरिता नियत केलेल्या दिनांकापासून पाच वर्षापर्यंत त्याकाळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली ती तत्पूर्वी विसर्जित झाली नसेल तर आस्तित्वात राहील. त्यापेक्षा अधिक काळ नाही.'थोडक्यात, पंचायतराजमधील तिन्ही स्तरांचा कालावधी समान म्हणजेच पाच वर्षाचा ठेवण्यात आला.

**निष्कर्ष :-**

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अमुलाग्र परिवर्तन होण्यास ७३ वी घटनादुरुस्ती आणि महिला आरक्षण कारणीभूत आहे. पूर्वीच्या काळी चूल आणि मूल एवढेच स्त्रियांचे कार्यक्षेत्र समजले जात होते. आज महिला सामाजिक क्षेत्रात आणि राजकारणात आपला प्रभाव आणि स्थान दाखवित आहेत. पंचायतराज व्यवस्थेत महिलांसाठी ५०% आरक्षणाची सोय असल्यामुळे त्यांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यामध्ये आपला प्रभाव दाखविण्यास सुरूवात केलेली आहे. कार्याध्यक्षाच्या पदांना सुध्दा आरक्षण असल्यामुळे भरपूर ठिकाणी सरपंचपदी व सभापतीपदी महिला विराजमान असताना दिसून येत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थेतील निवडणूकांच्या माध्यमातून प्रचार करण्यासाठी महिला समोर येताना दिसत आहे. बऱ्याच महिला स्वतःचा तसेच आपल्या सहकाऱ्यांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी समाजामध्ये फिरताना आणि बोलताना पहावयास मिळत आहे. सभा घेणे. बैठका घेणे, प्रत्यक्ष भेटी घेणे इत्यादींच्या माध्यमातून स्त्रिया समाजाशी विचार विनिमय करताना दिसत आहेत. तसेच याचमाध्यमातून स्त्रीवर्गाच्या जाणीव जागृतीला चालना मिळत आहे. स्त्रियांपुढे येत आहेत. आरक्षणाच्या माध्यमातून स्त्रियांना समाजामध्ये वावरण्याचे एक मोठे व्यासपीठ मिळालेले आहे. त्यांना त्यांच्या अधिकार आणि कर्तव्याची संपूर्ण जाणीव झालेली आहे.

महिला आरक्षणामुळे आज प्रत्येक ग्रामपंचायतीत किमान ४ महिला सदस्या प्रतिनिनिधत्व करताना दिसून येत आहेत. या स्त्रियांच्या माध्यमातून स्त्रियांना समाजात असणाऱ्या अडचणी व समस्यांचा विचार व सोडवणूकीसाठी याची फार मोठी मदत होऊ शकते.

**संदर्भ :-**

१) प्रा.डॉ.ठोंबरे सतीश, 'ग्राम प्रशासन,' कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, नोंव्हेबर २०१०

२) डॉ.आंबेडकर भीमराव रामजी, 'भारताचे संविधान' डॉ. आंबेडकर साहित्य प्रचार मंडळ, नागपूर, सातवी आवृत्ती २००८

३) डॉ.नलावडे पंडित शेषराव, 'सत्ताविकेंद्रीकरण आणि ७३वी घटनादुरुस्ती' चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००८

४) डॉ.दिवाण मोहन, प्रा. देवधर जयंत, प्रा. दिवाण विवेक, 'भारतातील राज्यांचे राजकारण'विद्या प्रकाशन, नागपूर,प्रथमावृत्ती २ डिसेंबर २००४

५) डॉ.पाटील वा.भा., 'पंचायतराज' प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव ,प्रथमावृत्ती २००९